# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 November 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आज राज्यात विविध ठिकाणी प्रचार सभा
- स्वीप या मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत राज्यात ठिकठिकाणी चित्ररथ रवाना, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध उपक्रम
- कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथं मुख्य शासकीय महापूजा, ठिकठिकाणच्या विठ्ठल मंदीरांमध्ये भाविकांची गर्दी

आणि

- महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत सलामीच्या सामन्यात भारताचा मलेशियावर चार – शून्य असा विजय

****

भाजपाचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज राज्यात चिमुर, सोलापूर आणि पुणे इथं प्रचारसभा होणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईतल्या दोन सभांना संबोधित करतील. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे चिखली आणि गोंदिया मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

****

निवडणुकीच्या प्रचारासाठी शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार संजना जाधव, तर वैजापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रमेश बोरनारे यांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या. वैजापूर इथल्या सभेत मुख्यमंत्र्यांनी, लोकसभा निवडणुकीत शिवसेनेनं

आपली ताकद दाखवून दिली असून, विधानसभा निवडणुकीत विक्रमी यश मिळवू, असा विश्वास व्यक्त केला.

***“लोकसभेत आपण त्यांना त्यांची जागा दाखवली. आपला धनुष्यबाण आणि शिवसेना यांनी लोकसभेत त्यांच्यापेक्षा दोन लाख सात हजार मतं जास्त घेतली. स्ट्राईक रेट आपला वाढला. व्होट शेअर आपला वाढला. आणि म्हणून या विधानसभेमध्ये आपल्याला रेकॉर्ड करायचं आहे.”***

****

त्यानंतर जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी इथं घेतलेल्या प्रचारसभेत शिंदे यांनी, मराठवाडा आणि दुष्काळ हे दोन शब्द आपल्याला वेगळे करायचे असून, विकासाच्या माध्यमातून मराठवाड्याला न्याय द्यायचा असल्याचं सांगितलं. महायुतीच्या दहासूत्री कार्यक्रमाचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला. जालना इथल्या आझाद मैदानावर महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्या प्रचारार्थ शिंदे यांची सभा झाली.

****

निवडणुकीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर इथं भारतीय जनता पक्षाच्या वतीने काल पत्रकार परिषद घेण्यात आली. खासदार डॉ. भागवत कराड, औरंगाबाद पूर्व मतदार संघाचे उमेदवार अतुल सावे यांनी महायुतीच्या काळात शहरात झालेल्या विकासात्मक कार्याची माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येत्या १४ तारखेला चिकलठाणा इथं सभा होणार असल्याची माहिती कराड यांनी यावेळी दिली.

औरंगाबाद मध्यचे महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांच्या प्रचारार्थ काल काढण्यात आलेल्या रॅलीत अभिनेते गोविंदा सहभागी झाले होते.

औरंगाबाद पश्चिम मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी काल वेंदात नगर, कबीर नगर, एकनाथ नगर, हमाल वाडी, राहूल नगर, बाला नगर परिसरात परिवर्तन पदयात्रा काढली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल यवतमाळ जिल्ह्यात वणी मतदारसंघात प्रचारसभा घेतली. जुनी पेन्शन आणि सार्वत्रिक मोफत शिक्षण लागू करण्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

***ज्या काही गोष्टी आपण देऊ इच्छित आहोत, जसं महिलांना सुरक्षा म्हणजे प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्रमध्ये पोलीस स्टेशन एक वेगळं महिलांसाठी महिला***

***पोलीस अधिकारी आणि महिला पोलीस शिपाई असलेलं पोलीस स्टेशन आपण उभारणार आहोत. शेतकऱ्यांचं नुकसान होऊ न देता जे जीवनावश्यक पाच वस्तू आहेत मग त्याच्यामध्ये गहू आला, तांदूळ आला, साखर, तेल, डाळ या जीवनावश्यक वस्तूंचे भाव आपण पुढची पाच वर्ष हे स्थिर ठेऊन दाखवणार. त्याच्यानंतर ज्याप्रमाणे मुलींना मोफत शिक्षण दिलं जातं तसंच मोफत शिक्षण मी माझ्या महाराष्ट्रात जन्मलेल्या मुलांना सुद्धा देणार आहे.***

****

धाराशिव इथं तुळजापूर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राणा जगजितसिंह पाटील यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत महायुती सरकारने राबवलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

****

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र ओबीसी सेनेनं शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष शरद भोवर यांनी ही माहिती दिली.

****

केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे राज्यातल्या १४ जिल्ह्यात कालपासून मतदार जागृती अभियान सुरु करण्यात आलं आहे. मतदारांना खात्रीने मतदान करण्याचं आवाहन करत शहर आणि ग्रामीण भागात दहा दिवस हा प्रचार रथ फिरणार आहे.
छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून हा चित्ररथ रवाना करण्यात आला. मतदानाची टक्केवारी ७५ ते ८० टक्क्यापर्यंत वाढवण्यासाठी या चित्ररथाचा उपयोग होईल, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

> ***“आपल्या जिल्हाभरामध्ये मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी या रथाचं आजपासून आपण प्रारंभ करत आहोत. आणि एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी आपल्याला हा कार्यक्रम राबवायचा आहे. आपल्या जिल्ह्यातल्या विशेषत: शहरातल्या मतदानाची टक्केवारी अतिशय चिंताजनक आहे. आणि भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाला ही चिंता वाटली पाहिजे की या पद्धतीने जर मतदानाची टक्केवारी कमी होत गेली तर लोकशाहीला धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.’’***

केंद्रीय संचार ब्युरोचे सहायक संचालक माधव जायभाये यांच्यासह जिल्ह्याचे मतदान जनजागृती विषयी आयकॉन असलेले प्रेषित रुद्रवार, अर्चना गायकवाड, श्रेयस यांची याप्रसंगी उपस्थिती होती.

****

नांदेड विधानसभा मतदार संघातल्या गावामध्येही एलईडी व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येणार असून, या व्हॅनचं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते उद्घाटन झालं. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, केंद्रीय संचार ब्युरोचे सुमीत डोडल उपस्थित होते. जिल्ह्यात मागील निवडणुकीमध्ये ज्या ठिकाणी कमी मतदान झालं आहे, त्याठिकाणी या व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येईल, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

****

धाराशिव इथं अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीनं मतदार जनजागृती यात्रेचा काल प्रारंभ झाला. मतदारांना मतदानाचं महत्त्व सांगून मतदान करण्याचं आवाहन या यात्रेतून करण्यात येणार आहे. जिल्ह्यातल्या पाच तालुक्यातल्या ५० गावांमधून जवळपास एक लाख मतदारांपर्यंत ही यात्रा पोहोचणार आहे.

****

निवडणुकीमध्ये महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी लातूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, स्वीप कक्ष आणि दयानंद महाविद्यालयाच्या वतीने काल घेतलेल्या विशेष कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘तिचा आवाज, तिचं मत आहे मौल्यवान’ ही संकल्पना घेवून आयोजित या कार्यक्रमास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महिलांशी संवाद साधला. यावेळी उपस्थितांना मतदार जागृतीची शपथ देण्यात आली.

****

येत्या २० तारखेला होणार्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याने केलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज पुणे जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

कार्तिकी एकादशी आज साजरी होत आहे. पंढरपूर इथं श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आली. दरवर्षी शासकीय महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येते, मात्र यंदा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने ही महापूजा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आली. लातूर जिल्ह्यातले सागरबाई आणि बाबुराव सगर या दाम्पत्याला पूजेचा मान मिळाला. यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम उपस्थित होते. एकादशीनिमित्त सुमारे दोन लाखावर भाविक पंढरपुरात दाखल झाले आहे.

कार्तिकी एकादशीनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथं दर्शनासाठी जाणार्या भाविकांची गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाकडून विविध आगारातून पैठणला जादा बस सोडण्यात येत आहेत.

छत्रपती संभाजीनगरनजिक पंढरपूर इथं देखील एकादशीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला सुरुवात झाली असून, काल पहिल्या दिवशी ९०० जणांनी मतदान केलं. जिल्ह्यात एकूण २७ हजार ९६४ दिव्यांग आणि ८५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या ५७७ जणांनी गृह मतदानासाठी नोंदणी केली आहे.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी गृहमतदानाला काल सुरुवात झाली.

हिंगोली जिल्ह्यात वसमत, कळमनुरी आणि हिंगोली मतदारसंघात काल सतराशे कर्मचाऱ्यांनी टपाली मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला.

****

लातूर इथं निवडणूक आयोगाच्या भरारी पथकानं काल जिल्हा परिषद प्रवेशद्वाराजवळ २५ लाख रुपयांची रोकड जप्त केली. निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नर्हे-विरोळे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.

हिंगोली इथंही वाशिम रोडवरील पिपल्स बँक परिसरात दुचाकीवरून बॅगमध्ये साडे चौदा लाख रुपये घेऊन जाणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं पकडलं.

****

महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताने सलामीच्या सामन्यात मलेशियाचा चार – शून्य असा पराभव केला. इतर सामन्यांमध्ये चीनने थायंलडचा १५ – शून्य असा पराभव केला, तर दक्षिण कोरिया आणि जपान मधला सामना दोन – दोन असा बरोबरीत सुटला. बिहारमधे नालंदा इथल्या राजगीर इथं ही स्पर्धा होत असून, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते काल या स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन झालं.

****